जा.क्र.शिपुप्रम/व्य.(प्र)/वाहन/निर्लेखन/११०५/८३३/८८५/२०१५
दिनांक :—१३.०८.२०१५

## जुन्या ३ वाहनांची विक्रीकरीता बोली/देकार मागविणेबाबत जाहीर नोटीस

शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित (शिपुप्रम)या शासन कंपनीच्या पंधरा वर्षापेक्षा जास्त वापरण्यात आलेल्या खालील तीन वाहनांचे निर्लेखन करण्यासाठी ती वाहने **ज्या स्थितीत आहेत, त्या स्थितीत**(As is where is basis)एकत्रितरीत्या विक्री करण्यासाठी बोली/देकार मागविण्यात येत आहेत. त्यासाठी सदर तिन्ही वाहने निर्लेखनासाठी एकत्रितरीत्या खरेदी करण्यास इच्छुक असणा—यांनी त्यांच्या बोली/देकार सीलबंद लिफाफ्यातून दिनांक ३१ ऑगस्ट २०१५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यत शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितच्या उपरोक्त कार्यालयात सादर करावीत. त्यानंतर कोणतीही बोली/देकार स्विकारले जाणार नाहीत. प्राप्त झालेल्या सीलबंद बोली/देकार दि. ०१ सप्टेंबर २०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता उघडण्यात येतील.

## निर्लेखित करण्याच्या ३ वाहनांचा तपशिल

| अ. क्र. (१) | वाहन क्रमांक (२) | वाहन खरेदी दिनांक (३) |
|---|---|---|
| १. | टाटा सूमो एम.एच.०२—जे.ए.—७०३३ | १६.११.१९९९ |
| २. | टाटा सूमो एम.एच.०२—जे.ए.—७०३९ | १६.११.१९९९ |
| ३. | ॲम्बेसिडर एम.एच.०२—जे.ए.—२९०८ | ०७.१२.१९९९ |

वरील तिन्ही वाहने कार्यालयीन इमारतीच्या आवारात पाहाणीकरीता उपलब्ध आहेत. संबंधित सर्व वाहनांचे आर.टी.ओ. रजिस्ट्रेशन संपुष्टात आलेले आहे.

**अटी व शर्ती :—**

१. अर्जदार व्यक्तीगत: स्वरुपात अर्ज करणार असल्यास अशाअर्जदाराचे वय दि. १४ ऑगस्ट, २०१५ रोजी किमान १८ वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे.
२. शासकीय परिवहन सेवेच्या परामर्शाने उपरोक्त तिन्ही वाहनांकरीता रु. ४२,९७५/—(रु.बेचाळीस हज़ार नऊशे पंच्याहत्तर) इतकी किमान किंमत निश्चित करण्यात आलेली आहे. त्यापेक्षा सर्वात जास्त रकमेची बोली/देकार सादर करणा—या व्यक्तीस/संख्या/कंपनी इत्यादिंना ती तिन्ही वाहने सुपूर्द करण्यात येतील.एकाच रकमेच्याएका पेक्षा जास्त बोली/देकार प्राप्त झाल्यास तशा प्रसंगी जास्त **"प्रथम बोली/देकार देणा—यास प्राधान्य"** या तत्वाची अंमलबजावणी करण्यात येईल.
३. कोणत्याही परिस्थितीत ठरविण्यात आलेल्या किमान एकूण रु. ४२९७५/— पेक्षा कमी बोली/देकाराचा विचार केला जाणार नाही.
४. सर्वात जास्त बोली/देकार देणा—यांने त्या रक्कमेचा ड्राफ्ट "SHIVSHAHI PUNARVASAN PRAKALP LTD." यांच्या नावे त्याच दिवशी अथवा उशिरात उशिरा दि. २ सप्टेंबर, २०१५ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यत शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितच्या कार्यालयात जमा करणे आवश्यक राहील.

५. उपरोक्त किमान किंमतीपेक्षा सर्वात जास्त बोली देणा—याने दि. २ सप्टेंबर २०१५ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यत बोलीचा ड्राफ्ट कंपनीकडे जमा न केल्यास तदनंतरची मोठी बोली/देकार देणा—यास दि. ०३ सप्टेंबर २०१५ रोजी संधी देण्यात येईल.

६. सर्वात जास्त बोलीच्या रकमेचा ड्राफ्ट दि. २ सप्टेंबर २०१५ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यत अथवा तत्पूर्वी शिपुप्रम कार्यालयात जमा केल्यावर तद्नंतर ४ दिवसांनी रक्कम जमा झाल्याची खात्री करुनउपरोक्त वाहने संबंधित देकार देणा—याकडे सूपुर्द करण्यात येतील.

७. सदरहू वाहने जेथे आहेत, जशी आहेत त्या स्थितीतून सर्वात जास्त रकमेची यशस्वी बोंली/देकार देणा–याने स्वत:च्या खर्चाने ती वाहने घेऊन जाण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे.

८. तिन्ही वाहने एकत्रित निर्लेखित करावयाची आहेत. त्यामुळे त्या तिन्ही मधील एक/दोन अथवा स्वतंत्र वाहनाकरीता आलेल्या देकारपत्र/बोलीचा विचार केला जाणार नाही.

९. देकार/बोली सादर करणे इच्छुक असलेल्या व्यक्ती/संस्था/कंपनी इत्यादिनी सोबतच्या देकार/बोली अर्जाच्या नमुन्यात दिनांक व स्वाक्षरीसह बोली/देकार देणा–याचेनांव, संपूर्ण पत्ता, दुरध्वनी क्रमांक आणि इन्कम टॅक्स पॅन क्रमांक इत्यादि अर्जातील सर्व माहिती मराठी/हिंदी/इंग्रजी यापैकी एका भाषेत नमूद करणे आवश्यक आहे. संपूर्णपणे न भरलेला अथवा आकलन न होणारा अथवा वाचणे शक्य नसलेला अर्ज पात्र समजण्यात येणार नाही.

विहित नमुन्यातील अर्ज भरुन त्यासोबत पॅन कार्डची स्वप्रमाणित(Self Attested)झेरॉक्स/फोटो प्रत जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्ज पात्र समजण्यात येणार नाही. सही ऐवजी अंगठा निशाणी सादर करण्या—या अर्जावर स्वाक्षिदाराचे नाव, पत्ता व साक्षीदाराचे असणे आवश्यक राहील.

१०. सशर्त बोली/देकार पात्र असणार नाहीत

११. उपरोक्त प्रक्रीयेत कोणताही प्रश्न/विवाद/मतभिन्नता निर्माण झाल्यास अथवा कोणत्याही मुदयाबाबत अर्थ अथवा विवेचन करण्याचा प्रसंग उद्भवल्यास 'व्यवस्थापकीय संचालक', शिपुप्रम यांचा निर्णय अंतीम राहील.

१२. प्राप्त होणा—या सर्व अथवा कोणत्याही बोली/देकार कोणतेही कारण न दर्शविता रदद् समजण्याचा अधिकार 'व्यवस्थापकीय संचालक' शिपुप्रम यानी राखून ठेवला आहे. त्यांचा निर्णय अंतिम व सर्वांवर बंधनकारक राहील.

देकार अर्ज नमुना सोबत आहे, संबंधित माहिती कार्यालयीन नोटीस बोर्डावर तसेच शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितच्या कार्यालयीन वेबसाईट"www.sppl.biz" वर देखील प्रसिध्द करण्यात येत आहे.आवश्यकता वाटल्यास किंवा अधिक माहितीसाठी कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक २६५९१०९३/२६५९९९८१ वर निम्नस्वाक्षरीत अधिका-यांशी संपर्क साधता येईल.

व्यंवस्थापकीय संचालक/शिपुप्रम यांच्या मान्यतेने.

व्यवस्थापक (प्रशासन)/शिपुप्रम

# अर्जाचा नमुना

(खालील जुन्या ३ निर्लेखित करावयाच्या वाहनांसाठी **देकार** सादर करण्याकरीता)

| अ.क्र. | वाहन क्रमांक | वाहन खरेदी दिनांक | तिन्ही वाहनांकरीता देऊ केलेली एकत्रित रक्कम |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | टाटा सुमो — एम्.एच्. — ०२—जेए ७०३३ | १६.११.१९९९ | रु. ............................... (अक्षरी रु. ....................................... ....................................................... ......................................................) |
| २. | टाटा सुमो — एम्.एच्. — ०२—जेए ७०३९ | १६.११.१९९९ | |
| ३ | टाटा सुमो — एम्.एच्. — ०२—जेए २९०८ | ०७.१२.१९९९ | |

१. देकार सादर करणाऱ्याचे संपूर्ण नाव : ..................................................................

२. संपूर्ण पत्ता : ..................................................................
..................................................................
..................................................................

३. दूरध्वनी क्रमांक : ..................................................................

४. इन्कम टॅक्स पॅन नंबर : ..................................................................
(स्वप्रमाणित प्रत सोबत जोडणे आवश्यक) ..................................................................

५. सध्या व्यवसाय करीत असल्यास : ..................................................................
व्यवसायाचा पत्ता ..................................................................
..................................................................
..................................................................

६. निविदा नोटीस मधील सर्व अटी/शर्ती व नियम मी/आम्ही वाचले असून त्या मला/आम्हाला मान्य आहेत.

**दिनांक :** **सही/अंगठा**

**साक्षीदाराचे नाव व पत्ता:** ....................................................
(देकार सादर करणाऱ्याने स्वाक्षरी ....................................................
ऐवजी अंगठा निशाणी सादर ....................................................
केल्यास साक्षीदाराचे नाव व ....................................................
स्वाक्षरी आवश्यक) ....................................................
**साक्षीदाराची स्वाक्षरी:** ....................................................